| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण**<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>**E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


**प्रेस नोट** दिनांक :- १४/०१/२०२५

## मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे ''क्षेत्रीय कार्यालयासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा'' कार्यक्रमास अनुसरून नाशिक ग्रामीण पोलीस दलाची अंमलबजावणी

---

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यामध्ये शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी ''क्षेत्रीय कार्यालयासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा'' निश्चित केलेला असुन त्या धर्तीवर क्षेत्रीय शासकिय व निमशासकिय कार्यालयाकरीता आगामी १०० दिवसांमध्ये खालीलप्रमाणे ०७ कलमी कृती आराखडा तयार करून त्या मुद्दयांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरून नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे खालीलप्रमाणे सुविधा पुरविण्याबाबत प्रामुख्याने लक्ष देण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस उपअधीक्षक मुख्यालय यांचे कार्यालयात नागरीकांना त्यांचे तक्रारी / अडचणींकरीता समक्ष भेटण्याची वेळ दुपारी ०३:३० वा. ते ०५:०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

लोकशाही दिनानिमित्त आठवडयाच्या दर शनिवारी जिल्हयामधील प्रत्येक पोलीस ठाणेस तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात येणार असून सदर वेळी संबंधीत उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच तत्सम वरिष्ठ अधिकारी हजर राहुन नागरीकांच्या तक्रारींची जागीच दखल घेवुन पुढील कार्यवाही करून तक्रारींचे निरसन करणार आहेत. तसेच जिल्हयातील नागरीकांकडून कार्यालयास / पोलीस ठाणेस प्रत्यक्ष अथवा (आपले सरकार, पी.जी.पोर्टल, शेतकरी सेल) या माध्यमांव्दारे प्राप्त झालेल्या तक्रारींची तात्काळ दखल घेवुन निरसन करण्यात येईल.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळ www.nashikruralpolice.gov.in अद्यावत करण्यात आले असुन, त्याव्दारे नागरीकांच्या तक्रारींची काटेकोरपणे दखल घेण्यात येईल असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे. तसेच सदर संकेतस्थळावर जागरूक नागरीकांव्दारे प्राप्त तक्रारी, अनोळखी मृतदेह, हरविलेल्या व्यक्ती, चोरीस गेलेली व बेवारस वाहने, माहिती अधिकारी, सायबर क्राईम रिपोर्टींग, उत्कृष्ट कामगिरी, ई-तक्रार, पोलीस पडताळणी सेवा, मोबाईल गहाळ फॉर्म याप्रमाणे नागरीकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हयातील नागरीकांना मिळणाऱ्या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रचलित कामकाजाच्या पध्दतीचे पुर्नविलोकन करून प्रशासकिय कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करून त्या सुलभ पध्दतीने देण्याबाबत कटीबध्द आहोत.